पाच पिढ्यांच्या विश्वासाची अखंड परंपरा
माणक ज्वेलर्स
फूलचंद माणकलाल अँण्ड कं.
१९०७, एम.जी.रोड.
चोपडा, जि. जळगाव
पिन-४२५१०७ ९३७०५८१५५३

सुविचार - जीवन हे एक कला आहे, आणि प्रत्येक दिवस हा एक नवीन कॅनवास. तुमच्या रंगांनी ते सुंदर बनवा.

महाराष्ट्राचे निडर दैनिक
# शौर्य मराठी
RNI-MAHMAR/2023/89125

| | |
|---|---|
| सेन्सेक्स | ७६,४८८.९६ +१,०७३.६१ (१.४२%) |
| डॉलर | ₹ ९५.२७ |

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ४३ | २७ |
| दिल्ली | ४३ | ३० |
| मुंबई | ३६ | २९ |
| नागपूर | ४३ | ३० |
| पुणे | ३७ | २५ |

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | मंगळवार, दि. २६ मे २०२६ | वर्ष २ रे | अंक १९४ किंमत : ५ रु. | पाने ४

| सूर्योदय | सूर्यास्त |
|---|---|
| स.-५:४७ | संध्या-७:०३ |

सोने - चांदी

| सोने(१० ग्रॅम) | चांदी (प्रति किलो) |
|---|---|
| १,५६,०००/- | २,६०,०००/- |

Rate By : माणक ज्वेलर्स, चोपडा

# तिहेरी अपघात ६ ठार; १२ गंभीर

## लळिंग घाटातील विचित्र अपघात; वाचवायला गेलेला टोल कर्मचाऱ्याचाही मृत्यू

वृत्तसंस्था । धुळे

**मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्गावरील लळिंग घाटात सोमवारी पहाटे भीषण तिहेरी अपघात झाला. वाळूने भरलेल्या डंपरने एका वाहनाला धडक दिली. याचवेळी मागून आलेली ट्रॅव्हल्स जोरदार धडकल्याने झालेल्या या अपघातात ६ जणांचा जागीच मृत्यू झाला असून १० ते १२ जण गंभीर जखमी झाल्याची माहिती समोर आली. अपघातानंतर घाट परिसरात एकच खळबळ उडाली असून महामार्गावरील वाहतूक काहीकाळ विस्कळीत झाली होती.**

मिळालेल्या माहितीनुसार, लळिंग घाटातून भरधाव जाणाऱ्या वाळूच्या डंपरवरील चालकाचे नियंत्रण सुटले. यामुळे डंपर विरुद्ध बाजूला गेला आणि समोरून जाणाऱ्या एका वाहनावर धडकला. याचवेळी मालेगावकडून आलेले ट्रॅव्हल्स अपघातग्रस्त वाहनांवर जोरदार धडकले.ही धडक इतकी भीषण होती की ट्रॅव्हल्सचा अक्षरशः चुराडा झाला.

अपघातानंतर घटनास्थळी प्रवाशांच्या किंकाळ्या आणि गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिक, महामार्ग पोलीस, तसेच टोल नाक्यावरील मदत पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. जखमींना बाहेर काढण्यासाठी मोठे बचावकार्य राबविण्यात आले. गंभीर जखमींना उपचारासाठी धुळे येथील शासकीय व खासगी रुग्णालयात हलविण्यात आले आहे. मृतांची आणि जखमींची ओळख पटवण्याचे काम सुरू असून मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. (पान २ वर)




अपघातानंतर लळिंग घाट परिसरात काही काळ भीतीचे आणि तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. महामार्गावरील वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाल्याने दोन्ही बाजूंना वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत अपघातग्रस्त वाहने बाजूला करत वाहतूक सुरळीत करण्याचे प्रयत्न केले. दरम्यान, संतप्त टोल कर्मचाऱ्यांनी मृत कर्मचाऱ्याच्या कुटुंबाला आर्थिक मदत, कायमस्वरूपी विमा संरक्षण आणि अपघातस्थळी सुरक्षा उपाययोजना करण्याची मागणी प्रशासनाकडे केली आहे.

## भारत-पाकिस्तान वाद वेगळा

# ट्रम्प म्हणाले, भारत माझा १००% मित्र

वृत्तसंस्था । वॉशिंग्टन

**अमेरिका आणि इराणमधील युद्धात पाकिस्तान मध्यस्थाची भूमिका बजावत आहे. यावरून भारताने कोणतीही तक्रार किंवा आक्षेप घेतलेला नाही, अशी माहिती अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांनी दिली आहे. चार दिवसांच्या भारत दौऱ्यावर आलेल्या रुबियो यांनी स्पष्ट केले की, भारताची पाकिस्तानबाबतची चिंता ही प्रामुख्याने दहशतवादाशी संबंधित आहे.**



मंगळवारी होणाऱ्या क्वाड देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीपूर्वी पत्रकारांशी बोलताना रुबियो म्हणाले, पाकिस्तानी भूमीवरून भारताला लक्ष्य करणाऱ्या दहशतवादी संघटनांबद्दल भारताला नेहमीच चिंता असते. भारताने हा मुद्दा अनेकदा मांडला आहे. मात्र, अमेरिका-इराण संघर्षात पाकिस्तानने बजावलेल्या मध्यस्थीच्या भूमिकेवर भारताने कोणताही आक्षेप घेतलेला नाही. भारताचा पाकिस्तानसोबतचा वाद पूर्णपणे वेगळा आहे. पाकिस्तानच्या लष्करी नेतृत्वाशी अमेरिका (पान २ वर)

## थोडक्यात



### पाकिस्तानात आत्मघाती हल्ल्यात २३ ठार, ५६ गंभीर

**इस्लामाबाद ।** बलुच लिबरेशन आर्मीच्या (बीएलए) मजीद ब्रिगेडच्या एका आत्मघाती हल्लेखोराने आज सकाळी पाकिस्तानमधील क्वेटा येथील चमन गेटजवळ, क्वेटा कँटमधून लष्करी जवानांना घेऊन जाणाऱ्या जाफर एक्सप्रेस ट्रेनवर प्राणघातक आत्मघाती हल्ला केला. रेल्वे रुळांजवळ झालेल्या या शक्तिशाली स्फोटात किमान २३ जण जागीच ठार झाले आणि ५३ जण गंभीर जखमी झाले. या स्फोटामुळे प्रवासी ट्रेनचा एक डबा पूर्णपणे उद्ध्वस्त झाला, तसेच रुळांजवळील अनेक घरे आणि वाहनांचेही मोठे नुकसान झाले. घटनेची माहिती मिळताच, स्थानिक रहिवासी आणि पोलीस अधिकारी तात्काळ घटनास्थळी जमा झाले आणि त्यांनी बचाव व मदतकार्य सुरू केले.

### आसगावच्या ८ मित्रांचा अपघातात मृत्यू

**सातारा ।** जिल्ह्यातील महाबळेश्वर-पोलादपूर मार्गावरील आंबेनळी घाटात मध्यरात्रीच्या सुमारास एक अत्यंत भीषण आणि काळजाचा थरकाप उडवणारा अपघात घडला आहे. एक भरधाव कार थेट १८०० फूट खोल दरीत कोसळल्याने एकाच जिल्ह्यातील ८ मित्रांचा जागीच मृत्यू झाला. यातील ५ तरुण कोरेगाव तालुक्यातील एकाच गावचे (आसगाव) असल्याने संपूर्ण गावावर आणि सातारा जिल्ह्यावर शोककळा पसरली आहे.



### महिला महसूल अधिकाऱ्याला लाच घेताना रंगेहाथ अटक

**पालघर ।** जिल्ह्यातील वसई विरार परिसरातून भ्रष्टाचाराविरोधातील मोठी कारवाई समोर आली आहे. एसीबी ने पेल्हार ग्रामपंचायतच्या ग्राम महसूल अधिकारी उज्वला प्रवीण पाटील यांना ४५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहाथ अटक केली आहे. एसीबीकडून मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदाराने केलेल्या रूम बांधकामाचा पंचनामा न करण्यासाठी उज्वला प्रवीण पाटील यांनी ४५ हजार रुपयांची मागणी केली होती. तसेच मौजे बिलालपाडा येथील सर्व्हे क्रमांक १३/०३ वरील माती भरणीच्या पंचनाम्यासंदर्भात आणखी १ लाख ५० हजार रुपयांची मागणी करण्यात आल्याचे तपासात समोर आले. अशाप्रकारे एकूण १ लाख ९५ हजार रुपयांची लाच मागितल्याचा आरोप आहे.

# कॉकरोच जनता पार्टीला ममता बॅनर्जी यांचा पाठिंबा

वृत्तसंस्था । चैन्नई




**तृणमूल काँग्रेसच्या नेत्या ममता बॅनर्जी आणि अभिषेक बॅनर्जी यांनी कॉकरोच जनता पार्टी या उपहासात्मक सोशल मीडिया चळवळीला आपला पूर्ण पाठिंबा दर्शवला आहे, अशी माहिती टीएमसीचे राज्यसभा नेते डेरेक ओब्रायन यांनी सोमवारी दिली.**

डेरेक ओब्रायन यांनी अधिकृत सोशल मिडियावर पोस्ट करत म्हटले की, ममता बॅनर्जी आणि अभिषेक बॅनर्जी यांच्यासोबत आठवडाभर विविध धोरणात्मक बैठका झाल्या. दोघेही जनहिताचा न्याय्य लढा लढण्यावर पूर्णपणे लक्ष केंद्रित करून आहेत आणि हो, त्या दोघांनीही कॉकरोचेस चळवळीबद्दल आपली पसंती आणि पूर्ण पाठिंबा व्यक्त केला असल्याचे त्यांनी सांगितले. पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या (पान २ वर)

## परिपत्रक तीनवेळा काढूनही त्याकडे दुर्लक्ष; ट्रॉमा रुग्णालयातील रुग्णांचे हाल

# डॉक्टरांकडून बायोमेट्रिक हजेरीला केराची टोपली

वृत्तसंस्था । मुंबई

मुंबई महानगरपालिकेच्या सर्व रुग्णालयातील डॉक्टरांची बायोमेट्रिक पद्धतीने उपस्थिती नोंदवण्यात येते. जोगेश्वरीतील हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे ट्रॉमा केअर रुग्णालयातील डॉक्टरांनी बायोमेट्रिक उपस्थिती नोंदवावी यासाठी जानेवारी २०२६ पासून आतापर्यंत तीनवेळा वैद्यकीय अधीक्षकांकडून परिपत्रक जारी करण्यात आले. मात्र खासगी रुग्णालयामध्ये रुग्णसेवा करणाऱ्या या डॉक्टरांकडून उपस्थितीच्या परिपत्राला केराची टोपली दाखवली जात आहे. परिणामी हजेरीपटावर उपस्थितीची नोंद



असली तरी रुग्णालयात डॉक्टर नसल्याने रुग्णांना अन्य रुग्णालयामध्ये उपचारासाठी पाठविण्यात येत आहे. त्यामुळे जोगेश्वरी, बोरिवली, मालाड येथील रुग्णांना चांगल्या आरोग्य सेवेपासून वंचित राहावे लागत आहे. (पान २ वर)

खासगी रुग्णालयामध्ये रुग्णसेवा देणारे हे डॉक्टर महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये फार कमी वेळा येतात. त्यामुळे उपचारासंदर्भात स्वतंत्र विभाग असला तरी डॉक्टर उपलब्ध नसल्याचे प्रकार सर्रास घडतात. त्यामुळे बऱ्याचदा गंभीर रुग्णांवर प्राथमिक उपचार करून त्यांना अन्य रुग्णालयात पाठविले जाते. यामुळे रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागते. परिपत्रकातील आदेश नव्या परिपत्रकानुसार बायोमेट्रिक उपस्थिती बंधनकारक करण्यात आली आहे. तांत्रिक अडचण असल्यास विभागप्रमुखांच्या मजुरीने उपस्थिती नोंदविण्याची तरतूद केली आहे.

# गायींची अवैध वाहतूक करणाऱ्यांवर चालणार बुलडोझर

## बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर गोतस्करांविरोधात विशेष मोहीम

वृत्तसंस्था । मुंबई

**आगामी बकरीद सणाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने गोतस्करी आणि जनावरांच्या अवैध वाहतुकीविरोधात कठोर भूमिका घेतली आहे. गायांची अवैधरित्या वाहतूक करणाऱ्यांवर बुलडोझर कारवाईसह कडक उपाययोजना करण्यात येणार असल्याचे पत्रकपरिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी जारी केले आहे.**

राज्य परिवहन विभागाने राज्यभर विशेष तपास मोहीम राबवण्याचा निर्णय घेतला आहे. २५ मे ते २८ मे दरम्यान विभागीय परिवहन अधिकारी, उपविभागीय परिवहन अधिकारी, सीमा तपासणी नाके आणि वाहतूक यंत्रणेला युद्धपातळीवर कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.राज्यात गायीला 'राज्यमाता'चा दर्जा देण्यात आला आहे. हिंदू समाजासाठी गाय ही श्रद्धा आणि संस्कृतीचा विषय असल्याने तिची हत्या किंवा अवैध वाहतूक सहन केली जाणार नाही, अशी माहिती सरनाईकांकडून देण्यात आली आहे.



राज्यात गोतस्करीचे प्रकार वाढत असल्याचे निदर्शनास आले आहे. जनावरांना उपाशी ठेवणे, अमानुष पद्धतीने वाहनांमध्ये कोंबून नेणे आणि अवैध कत्तलखान्यांकडे पुरवठा करणे असे प्रकार रोखण्यासाठी कठोर कारवाई केली जाणार असल्याचे सरनाईक यांनी सांगितले.त्यामुळे दोषींना कोणतीही सवलत दिली जाणार नसून थेट वाहने जप्त केली जाणार आहे.

# नाशिक धर्मांतर प्रकरणात दीड हजार पानांचे पहिले दोषारोपपत्र

वृत्तसंस्था । नाशिक

बहुराष्ट्रीय कंपनीतील अविवाहित तरुणीवर अत्याचार आणि तिच्या धर्मांतराच्या प्रयत्नाबाबत नाशिक पोलिस आयुक्तालयाच्या विशेष तपास पथकाने १८ साक्षीदारांच्या जबाबासह मुबलक पुराव्यांचे दोषारोपपत्र नाशिक जिल्हा व सत्र न्यायालयात दाखल केले आहे. दीड हजारांहून जास्त पानांचे हे दोषारोपपत्र असून, उर्वरित आठ गुन्ह्यांबाबत पुढील आठवड्यात दोषारोपपत्र दाखल होणार आहे.

नाशिक न्यायालयात दोषारोपपत्र दाखल

देवळाली कॅम्प पोलिस ठाण्यात २६ मार्च रोजी अविवाहित पीडितेच्या फिर्यादीवरुन दानिश शेख, तौसिफ अत्तार आणि निदा खान या तीन संशयितांविरुद्ध अत्याचारासह धार्मिक भावना दुखावल्याचा गुन्हा नोंद आहे. त्यापैकी दानिश व तौसिफ यांना एसआयटीने पुढील २८ मार्चपर्यंत अटक केली होती. तर, पसार असलेल्या निदा खान हिला ७ मे रोजी रात्री छत्रपती संभाजीनगरातून ताब्यात घेण्यात आले. निदाच्या जामीन अर्जावर २५ मे, तर दानिश व तौसिफच्या जामिनाबाबत ३० मे रोजी सुनावणी होणार आहे. या गुन्ह्याला २६ मे रोजी ६० दिनस पूर्ण होत असल्याने शुक्रवारी नाशिक न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.



# जळगाव विमानतळ विस्ताराचा मुहूर्त पावसाळ्यानंतरच?

## 'उडाण' योजनेंतर्गत विमानतळ टर्मिनल इमारत विस्तार, रनवे विस्तारासाठी लागेल विलंब

प्रतिनिधी । जळगाव

**उत्तर महाराष्ट्राच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मानल्या जाणाऱ्या जळगाव विमानतळाच्या विस्तार आणि आधुनिकीकरणाच्या हालचालींना आता वेग येण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. केंद्र सरकारने लोकसभेत दिलेल्या माहितीनुसार, जळगाव विमानतळावरील टर्मिनल विस्तार, प्रवासी सुविधा वाढ आणि भविष्यातील पायाभूत विकासासाठी प्राथमिक स्तरावरील नियोजन सुरू करण्यात आले आहे. यामुळे जळगावसह संपूर्ण उत्तर महाराष्ट्राच्या हवाई संपर्क व्यवस्थेला नवी दिशा मिळणार आहे.**




जळगाव विमानतळावरील विकास कामांची सद्यःस्थिती, ज्यामध्ये विमानतळ टर्मिनल इमारत विस्तार आणि धावपट्टी (रनवे) विस्ताराच्या कामांच्या प्रगतीचा समावेश आहे; तसेच प्रादेशिक संपर्क व्यवस्था आणि प्रवासी सेवा सुधारण्याच्या उद्देशाने विमानतळावरील विमानन सुविधांचा पुढील विस्तार, आधुनिकीकरणासह वृद्धीसाठीच्या भविष्यातील योजना आणि कालमर्यादा, याबाबत खासदार स्मिता वाघ यांनी लोकसभेत काही दिवसांपूर्वी अतारांकित प्रश्न (क्रमांक ६२२५) उपस्थित केला होता.

त्यास उत्तर देताना केंद्रीय नागरी विमानन राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी जळगाव विमानतळाच्या विकासासंदर्भातील सविस्तर माहिती सभागृहात मांडली. केंद्र सरकारच्या महत्त्वाकांक्षी 'उडान' योजनेंतर्गत जळगाव विमानतळाचा विकास प्रस्तावित असून, या प्रकल्पासाठी सुमारे २८.५५ कोटी रुपयांचा भांडवली खर्च मंजूर करण्यात आला आहे. या योजनेमुळे लहान शहरांना देशातील प्रमुख शहरांशी हवाई मार्गाने जोडण्याचे उद्दिष्ट साध्य होईल. जळगाव विमानतळ त्यातील एक महत्त्वाचा दुवा ठरु शकेल, असे मंत्री मोहोळ यांनी स्पष्ट केले होते. प्रस्तावित विस्तारामध्ये केवळ इमारतीचा (पान २ वर)

### विमानतळ विस्ताराचे असे आहे नियोजन

सध्या कार्यरत असलेल्या विमानतळाच्या टर्मिनल इमारतीचा विस्तार करण्याचा प्रस्ताव भारतीय विमानतळ प्राधिकरणाने तयार केला आहे. विद्यमान टर्मिनल इमारतीचे क्षेत्रफळ सुमारे ७०० चौरस मीटर असून, ते वाढवून अंदाजे १५०० चौरस मीटरपर्यंत नेण्याची योजना आखण्यात आली आहे. या प्रस्तावामुळे विमानतळावरील वाढत्या प्रवासी संख्येला अनुरूप सुविधा निर्माण करणे शक्य होणार आहे. विशेषतः गर्दीच्या वेळेत १५० आगमन आणि १५० निर्गमन प्रवाशांना हाताळण्याची क्षमता निर्माण करण्यावर भर दिला जाणार आहे.

# संपादकीय

## झुरळांची आभासी एकजूट !

सरन्यायाधीशांच्या वक्तव्याला प्रतिक्रिया म्हणून उदयाला आलेल्या कॉक्रोच जनता पार्टीने ऑनलाइनसारख्या आभासी जगतात मुसंडी मारली आहे. समाजमाध्यमांवर सक्रिय राहून व्यवस्थेवर टीकाटिप्पणी करणाऱ्या बेरोजगार तरुणांचा, सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी झुरळ असा उल्लेख केल्यानंतर या झुरळांच्याच नावाने पक्ष स्थापन करून चार दिवसांतच देशातील सर्वाधिक ऑनलाइन पाठीराखे मिळविण्याची घटना आपल्याकडील युवकांतील अस्वस्थता अधोरेखित करणारी आहे, यात शंका नाही. ऑनलाइन जगतात कॉक्रोच जनता पार्टीच्या (सीजेपी) झेंड्याखाली अल्पावधीत सुमारे दोन कोटी लोकांचे एकवटणे ही आजच्या माहिती तंत्रज्ञानावरील अवलंबित्व वाढलेल्या काळातील एक महत्त्वाची घटना आहे. समाजात प्रस्थापितांच्या विरोधात राग असतो. तो व्यक्त करण्यासाठी समाजमाध्यमे उपलब्ध असली, तरी त्याची तीव्रता वाढण्यासाठी आणि तो सत्ताधाऱ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी चळवळीचीही गरज असते. झुरळांच्या नावाने सुरू झालेला पक्ष अशी चळवळ उभा करू शकतो काय, हे पाहावे लागेल. तमिळनाडू विधानसभा निवडणुकीत अभिनेते विजय यांच्या पक्षाने समाजमाध्यमांचा मोठ्या प्रमाणावर उपयोग करून घेतला हे खरे; परंतु त्याच्या जोडीने रस्त्यावर उतरून आखणीही केली. रोजगार, महागाई यांसारख्या प्रश्नांना भिडणाऱ्यांच्या आणि रोज उपेक्षेला सामोरे जाणाऱ्यांच्या मनात असलेल्या तीव्र संतापाचे परिवर्तनात रूपांतर करण्यासाठी पक्ष स्थापून आणि त्याला कोट्यवधी ऑनलाइन पाठीराखे मिळवून सीजेपीने जोरकस पाऊल उचलले. आता याच पाठीराख्यांच्या मदतीने जमिनीवरून काम करावे लागेल आणि त्याचे आव्हान मोठे आहे. आजच्या काळात नॅरेटिव्ह म्हणजेच कथनाला विशेष महत्त्व आहे. समाजमाध्यमाद्वारे आपले कथन जोरकसपणे मन-मेंदूपर्यंत पोहोचविता येते. राजकारणाचा हा ऑनलाइन ते ऑफलाइन प्रवास नवा नाही. सीजेपीला तो आता करावा लागेल. मूळच्या छत्रपती संभाजीनगरातील आणि सध्या अमेरिकेत वास्तव्यास असलेल्या अभिजीत दीपके या युवकाने, सरन्यायाधीशांच्या वक्तव्यानंतर आपले कथन मांडले. बेरोजगार, आळशी, ऑनलाइन पडीक आणि सराईतपणे रडगाणे गाणारे या सर्वांना त्याने आवाहन केले. त्यात उपहास असला, तरी तो विदारक होता. त्याच्या आवाहनाला मोठा प्रतिसाद मिळाला. आपल्याला एखाद्या झुरळासमान मानावे याचा रागही या प्रतिसादात आहे. बेरोजगार तरुणांमधील खदखद किती खोलवर आहे, हे यातून दिसते. झुरळाच्या नावे पक्षस्थापनेची घटना, तिला मिळालेला प्रतिसाद आणि दीपके यांची विधाने पाहता हा विषय मागे पडणारा नाही. तसेच तो बेदखल करण्याजोगाही नाही. मात्र, समाजमाध्यमांवरील पाठीराख्यांची संख्या हा निकष असू शकतो काय? याचे उत्तर हे कथित पाठीराखे कुणाचे यावर बेतलेले असते. स्वत: ला झुरळ म्हणवून घेत पुढाकार घेणारा दीपके सध्या तरी भारतात राहत नाही. सारी सूत्रे तो अमेरिकेत राहून हलवितो आहे. या पक्षाबाबत तो किती गंभीर आहे, हे त्याच्या पुढील कृतींवरून कळेल. सीजेपीच्या पाठीराख्यांत असे परदेशांतील अनेक जण असू शकतात. मात्र, त्यांच्या वाढत्या संख्येची येथील प्रस्थापितांना दखल घ्यावी लागली. राज्यघटनेच्या चौकटीत राहून, अराजकतेला आमंत्रण न देता सामान्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी राजकीय पक्षाच्या रूपाने पुढे येणाऱ्या सर्वांचेच स्वागत करायला हवे.

# अक्कलकुव्यात गॅस सिलिंडरचा काळाबाजार

## ३ हजार रुपयांना सिलिंडरची विक्री, कृत्रिम टंचाईमुळे नागरिकांना भुर्दंड

प्रतिनिधी । तळोदा

**अक्कलकुवा शहरात स्थानिक गॅस एजन्सी मालकाच्या संगनमताने गॅस सिलिंडरचा मोठ्या प्रमाणावर काळाबाजार सुरू असून घरगुती वापराचा सिलिंडर तब्बल २ ते ३ हजार रुपयांपर्यंत बेकायदेशीरपणे विकला जात असल्याचा गंभीर आरोप नागरिकांकडून केला जात आहे. या प्रकारामुळे शहरात गॅसची कृत्रिम टंचाई निर्माण झाली असून, सर्वसामान्य नागरिकांना, विशेषत: महिला व मजुरांना प्रचंड मानसिक व आर्थिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे.**



याबाबत माहिती अशी की, हक्काचा गॅस मिळवण्यासाठी नागरिक पहाटे ५ वाजेपासूनच गॅस एजन्सीसमोर रांगा लावत आहेत. कडक उन्हात ४ ते ५ तास उभे राहूनही, अनेक नागरिकांचा नंबर येण्यापूर्वीच सिलिंडर संपले असे सांगून त्यांना माघारी पाठवले जाते. एजन्सीच्या काही पंटरांमार्फत मात्र मागच्या दाराने चढ्या दराने सिलिंडरची विक्री सुरू असल्याचे चित्र आहे. त्यामुळे तासनतास रांगेत उभे राहणाऱ्या महिला, वृद्ध आणि कामगार वर्गात प्रशासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त होत आहे. या संपूर्ण गैरप्रकाराबाबत स्थानिक नागरिकांनी संताप व्यक्त केला असून, संबंधित पुरवठा विभाग आणि प्रशासनाने या प्रकरणाची तात्काळ सखोल चौकशी करावी, अशी मागणी केली आहे. दोषी एजन्सी मालक आणि काळाबाजार करणाऱ्या दलालांवर कडक कायदेशीर कारवाई करून अक्कलकुवा शहरात नियमित आणि पारदर्शक गॅस पुरवठा सुरू करावा, अशी मागणी नागरिकांनी लावून धरली आहे.

**आम्ही गोरगरीब मजूर लोक आहोत. पहाटे ५ वाजल्यापासून कामधंदा सोडून उन्हात रांगेत उभे राहावे लागते. ५ तास थांबूनही सिलिंडर संपल्याचे सांगितले जाते. मात्र, ३ हजार रुपये मोजले की लगेच सिलिंडर मिळतो. हा सर्वसामान्य जनतेची लूट करणारा प्रकार असून प्रशासनाने यावर तात्काळ बंदी आणावी.**

**- भावेश पाडवी,**
स्थानिक नागरिक, अक्कलकुवा

**अक्कलकुवा शहरात गॅसचा कृत्रिम तुटवडा निर्माण करून एजन्सी मालक आणि दलालांचे फावले आहे. अधिकृत दरापेक्षा दुप्पट-तिप्पट किंमत वसूल केली जात आहे. पुरवठा विभागाने या काळाबाजाराची सखोल चौकशी करून एजन्सीचा परवाना रद्द करावा, अन्यथा आम्हाला तीव्र आंदोलन करावे लागेल.**

**- हेमराज पठाण,**
सामाजिक कार्यकर्ते



# शिरपूरमध्ये २८ मे रोजी जिल्हास्तरीय रोजगार मेळावा

प्रतिनिधी । शिरपूर

जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार तरुण-तरुणींसाठी रोजगाराची मोठी संधी उपलब्ध झाली असून, येत्या २८ मे रोजी शिरपूर येथे जिल्हास्तरीय पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

हा मेळावा आर. सी. पटेल आर्ट्स, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेजच्या सेमिनार हॉलमध्ये (करवंद नाका) सकाळी ९.३० ते सायंकाळी ४ या वेळेत होईल. या मेळाव्यात एकूण १६७० रिक्त पदे भरली जाणार आहेत. दहावी, बारावी, आयटीआय (सर्व ट्रेड्स), पदवीधर, पदव्युत्तर, डिप्लोमा, बी.ई., बी.टेक, आणि फार्मसी उत्तीर्ण उमेदवार पात्र राहतील आहेत. १८ ते ४५ वयोगटातील उमेदवारांना संधी मिळेल. मेळाव्यात ३५ हुन अधिक नामांकित कंपन्या थेट मुलाखती घेणार आहेत.

# उमर्टीतून गावठी कट्टे आणणारे नाशिकचे दोघे जेरबंद

प्रतिनिधी । धुळे

**मध्यप्रदेशातील उमर्टी येथून गावठी बनावटीची पिस्टल व जिवंत काडतुसे घेऊन शिरपूरकडे येणाऱ्या दोन संशयितांना शिरपूर तालुका पोलिसांनी सिनेस्टाईल पाठलाग करीत जेरबंद केले. त्यांच्याकडून तीन गावठी कट्टे, सहा जिवंत काडतुसे व अतिरिक्त मॅगझिन असा एकूण १ लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

दि.२३ मे रोजी सायंकाळी साडेसहा वाजेच्या सुमारास शिरपूर तालुका पोलीस ठाण्याच्या गुन्हेशोध पथकाला शिरपूर तालुका पोलिसांची सिनेस्टाईल कारवाई गोपनीय माहिती मिळाली होती की, दोन जण उमर्टी (मध्यप्रदेश) येथून आंबेगावमार्गे शिरपूरकडे गावठी कट्टे व जिवंत काडतुसे घेऊन येत आहेत. याबाबतची माहिती पोलीस निरीक्षक किशोरकुमार परदेशी यांना देण्यात आली. त्यांच्या सूचनेनुसार पथकाने खंबाळे आंबे रस्त्यावर सापळा रचला. दरम्यान, आंबे गावाबाहेरील दगडी बाकड्याजवळ संशयित इसम दिसून आले. पोलिसांची गाडी पाहताच दोन त्यांनी पळ काढण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांनी पाठलाग करून दोघांनाही ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी आपली नावे विकास उर्फ पल्लूराम मनोज घारु (वय ३०, रा. बाजीराव नगर, येवला, जि. नाशिक) व रावसाहेब अशोक मोरे (वय २९, रा. निमगाव, ता. येवला, जि. नाशिक) अशी सांगितली. अंगझडती घेतली असता ३ गावठी बनावटीचे कट्टे, दोन अतिरिक्त मॅगझिन आणि ७.६५ एमएमची सहा जिवंत काडतुसे आढळून आली. ३० हजाराचे ३ गावठी कट्टे, प्रत्येकी २ हजाराचे २ मॅगझिन, १२ हजाराचे ६ जिवंत काडतुसे असा एकुण १ लाख ६ हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी पोहेकॉ विजय ढिवरे यांच्या फिर्यादीवरून दोघांवर शिरपूर तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा आर्म अ‍ॅक्ट कलम ३/२५ तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७ (१) (३) सह १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली असून पुढील तपास पोसई मनोज कचरे करीत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी विश्वजीत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक किशोरकुमार परदेशी, पोसई मनोज कचरे, पोहेकॉ संतोष पाटील, संदीप ठाकरे, राजू ढिसले, पोकॉ योगेश मोरे, विजय ढिवरे, स्वप्निल बांगर, अल्ताफ मिर्झा व इसरार फारुकी यांच्या पथकाने केली.

# शिंदखेडा येथे विविध विकासकामांचे भूमिपूजन



प्रतिनिधी । शिंदखेडा

**येथील प्रभाग क्र. ११, १२ व १५ मधील विविध विकास कामांचे भूमिपूजन नगराध्यक्षा कलावती माळी यांच्या हस्ते करण्यात आले. प्रभाग क्र.१५ मध्ये माळीवाडा येथील मारुती मंदिराजवळ दहा सिटचे पुरुष शौचालय नागरी दलितेत्तर सुधारणा योजनेंतर्गत भूमिपूजन करण्यात आले. तसेच याच प्रभागाला जोडणाऱ्या श्री प्रकाश सखाराम माळी ते आस्था मार्टपर्यंतच्या रस्ता कॉंक्रिटीकरणाचे भूमिपूजन नगराध्यक्षा कलावती माळी यांच्या हस्ते करण्यात आले.**

यावेळी माजी पंचायत समिती सभापती प्रा. सुरेश देसले, गटनेते राकेश माळी, प्रा. सतीश पाटील, नगरसेविका पुष्पा गोपाळराव सोनवणे, कमल रवींद्र पाटोळे, रर्जू सुभाष माळी, सुनीता अरुण देसले, अर्जुन रामसिंग भिल, प्रा. दीपक माळी, लोटन माळी, अरविंद माळी, वेडू माळी, अरुण देसले नितीन माळी, सागर माळी उपस्थित होते. सावता व्यायाम शाळेला व्यायामाचे साहित्य भेट श्री संत सावता व्यायाम शाळेला नगरपंचायतीचे गटनेते राकेश माळी यांनी सुमारे आठ लाख रुपयांचे व्यायामाचे साहित्य भेट दिले. यावेळी या व्यायामाच्या साहित्याचे लोकार्पण सोहळा झाला. नगराध्यक्षा कलावती सुकलाल माळी, माजी पंचायत समिती सभापती सुरेश देसले यांच्या हस्ते हे व्यायामाचे साहित्य युवकांना लोकार्पण करण्यात आले. कार्यक्रमास नगरसेविका पुष्पा सोनवणे, रजू सुभाष माळी, सुनीता अरुण देसले, कमलबाई रवींद्र पाटोळे, अर्जुन रामसिंग भील, प्रा. दीपक सुकलाल माळी, अरुण देसले, लोटन माळी, अ‍ॅड. बी. व्ही. सोनवणे, सागर सोनवणे आदी उपस्थित होते. सुरेश देसले, सुभाष माळी, प्रा. सतीश पाटील यांनी मनोगत व्यक्त केले.

# पान १ वरून

### तिहेरी अपघात ६......

टोल कर्मचाऱ्यांचे आंदोलन - दरम्यान, अपघातस्थळी मदतकार्य करण्यास धावत जाणाऱ्या लळिंग टोल नाक्यावरील कर्मचाऱ्यांस एका ट्रॅव्हल्सने चिरडल्याने त्याचाही जागीच मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. यामुळे संतप्त झालेल्या कर्मचाऱ्यांनी लळिंग टोल नाक्यावर आंदोलन सुरू करत टोल वसुली बंद पाडली. आम्हाला कोणतीही सुरक्षा नाही, विमा संरक्षण नाही, तरीही आम्ही जीव धोक्यात घालून अपघातग्रस्तांना मदत करतो. आमच्या कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला असून राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने आवश्यक सुविधा व सुरक्षा पुरवायला हवी होती, असा आरोप आंदोलक कर्मचाऱ्यांनी केला.

### ट्रम्प म्हणाले, भारत......

पुन्हा जवळीक साधत असल्याच्या प्रश्नावर रुबियो यांनी सावध भूमिका घेतली. ते म्हणाले, जगातील इतर देशांशी आमचे व्यावहारिक पातळीवर संबंध आहेत, तसेच ते भारताचेही आहेत. पण आमचे इतर कोणत्याही देशासोबतचे संबंध हे भारतासोबतच्या धोरणात्मक भागीदारीच्या किमतीवर असू शकत नाहीत. हे सरकार पूर्ण होईपर्यंत भारत-अमेरिका संबंध इतिहासात सर्वाधिक मजबूत होतील.

### डॉक्टरांकडून बायोमेट्रिक......

मुंबई महानगरपालिकेच्या सर्व रुग्णालयांमधील डॉक्टरांना कर्तव्यावर रूजू होताना व कर्तव्य समाप्तीनंतर फेस पंचिंगद्वारे हजेरी नोंदविणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यानुसार जोगेश्वरीतील ट्रॉमा केअर रुग्णालयातील वैद्यकीय अधीक्षकांनी डॉक्टरांच्या उपस्थितीसंदर्भात जानेवारी २०२६ पासून तीनवेळा परिपत्रके काढली आहेत. तत्कालीन वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रवीण बांगर, डॉ. हनुमंत वायकुळे यांनी त्यांच्या कार्यकाळामध्ये उपस्थितीसंदर्भातील परिपत्रके काढली होती. मात्र त्याकडे रुग्णालयातील डॉक्टरांकडून दुर्लक्ष करण्यात आले. सध्या वैद्यकीय अधीक्षक असलेले डॉ. बलराम बसवंत यांनी फेस रेकग्निशनच्या माध्यमातून उपस्थिती नोंदविण्याबाबत डॉक्टरांना आदेश दिले आहेत. हे परिपत्रक काढून १५ दिवस उलटले तरीही अद्यापपर्यंत एकाही डॉक्टराकडून बायोमेट्रिक उपस्थिती नोंदविली जात नाही.

### जळगाव विमानतळ विस्ताराचा......

आकार वाढविणे एवढाच उद्देश नसून, प्रवाशांना आधुनिक दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यावरही भर दिला जाणार आहे. यामध्ये प्रशस्त प्रतीक्षालय, अत्याधुनिक सुरक्षा तपासणी व्यवस्था, चेक-इन काउंटरची संख्या वाढविणे, डिजिटल माहिती प्रणाली, बॅगेज हाताळणी सुविधा, पार्किंग व्यवस्था, स्वच्छतागृहे, दिव्यांगांसाठी विशेष सुविधा आणि विमानतळ परिसरातील इतर पूरक पायाभूत सुविधा उभारण्याचा समावेश असण्याची शक्यता आहे. प्रत्यक्ष कामाला सुरुवात केव्हा?- केंद्रीय नागरी विमानन मंत्रालयाने स्पष्ट केल्यानुसार, जळगाव विमानतळाच्या विस्ताराचा प्रस्ताव अद्याप प्राथमिक नियोजन टप्प्यात आहे. त्यासाठी विविध शासकीय मंजुऱ्या आवश्यक आहेत. यामध्ये जमीन उपलब्धता, पर्यावरणीय आणि वैधानिक परवानग्या, तांत्रिक तपासण्या तसेच आर्थिक मंजुऱ्यांचा समावेश असेल. त्यामुळे प्रकल्पाच्या अंतिम कालमर्यादेबाबत अद्याप अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही. जळगाव विमानतळाच्या धावपट्टी विस्तारासंदर्भातही भविष्यातील नियोजनावर सरकारचे लक्ष केंद्रीत असल्याचे संकेत मिळाले आहेत. सध्या उपलब्ध धावपट्टीवर मर्यादित क्षमतेची विमाने कार्यरत असली तरी, भविष्यात मोठ्या प्रवासी विमानांच्या सेवांसाठी आवश्यक सुविधा निर्माण करण्याचा विचार सुरू आहे. महानगरांशी थेट संपर्क वाढणार - धावपट्टी विस्तार झाल्यास अधिक क्षमतेची विमाने जळगावमध्ये उतरू शकतील. जळगावहून गोवा, मुंबई, पुणे, हैदराबाद, अहमदाबाद विमानसेवा सध्या सुरु आहे. याव्यतिरिक्त दिल्ली, बेंगळुरू, जयपूर यांसारख्या महानगरांशी थेट संपर्क वाढण्याची शक्यता निर्माण होईल. उत्तर महाराष्ट्रातील औद्योगिक, कृषी आणि व्यापारी क्षेत्रासाठी हा विकास महत्त्वाचा मानला जात आहे.

### कॉकरोच जनता पार्टीला......

निकालानंतर पक्षाच्या भविष्यातील दिशेबाबत बॅनर्जी सध्या वरिष्ठ नेत्यांसोबत आढावा बैठका घेत आहेत. बोस्टनस्थित अभिजीत दिपके यांनी १६ मे रोजी कॉकरोच जनता पार्टी या डिजिटल गटाची स्थापना केली. भारताचे सरन्यायाधीश सूर्य कांत यांनी बेरोजगार तरुणांविषयी केलेल्या एका कथित टिप्पणीच्या निषेधार्थ या अनोख्या गटाचा उदय झाला.

# चेन स्नॅचिंग, घरफोडी करणारे चोरटे जेरबंद

प्रतिनिधी । धुळे

**शहरातील चेन स्नॅचिंग व घरफोड्या करणाऱ्या आंतरजिल्हा टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश करत दोन सराईत चोरट्यांना अटक केली. त्यांच्या ताब्यातून सोन्या-चांदीचे दागिने व चोरीच्या मोटारसायकलींसह पाच लाख ११ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.**

या आरोपींमध्ये फैजान उर्फ इन्या मुजम्मिल अन्सारी (रा. हाजीनगर, वडजाई रोड, धुळे) व शोएब शेख सलीम मणियार (रा. कबीरगंज, रहमत मशिदीजवळ, धुळे) यांचा समावेश आहे. आरोपींपैकी फैजान अन्सारी हा सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर विविध पोलीस ठाण्यांत २६ गंभीर गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अंमलदार आरिफ पठाण यांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, भगवा मोहन नगर परिसरातील अरिहंत मंगल कार्यालयाजवळ दोन संशयित तरुण विनानंबर प्लेटच्या स्प्लेंडर दुचाकीसह संशयास्पद हालचाली करत असल्याने त्यांना ताब्यात घेतले.

# दीडशे लाभार्थ्यांना वॉटर व्हील ड्रमचे मोफत वाटप

प्रतिनिधी । शिरपूर



अस्तित्व सोशल वेलफेअर फाऊंडेशन संचालिका द्वेता पटेल नथवानी यांच्यातर्फे आर.सी.पटेल मेन बिल्डिंग येथील राजगोपाल भंडारी हॉलमध्ये १५० लाभार्थ्यांना वॉटर व्हील ड्रम (चल जलकुंभ)चे मोफत वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे दुर्गम, आदिवासी भागातील महिलांना पाणी वाहून नेण्यास मोठी मदत होणार आहे. तर एसव्हीकेएम संचलित तपनभाई मुकेशभाई पटेल मेमोरियल हॉस्पिटल व अस्तित्व सोशल वेलफेअर फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य सप्ताह साजरा करण्यात येत आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आ. काशिराम पावरा हे होते. तसेच प्रियदर्शिनी सहकारी सूतगिरणीचे चेअरमन तथा माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल, अस्तित्व सोशल वेलफेअर फाऊंडेशनच्या संचालिका कृतिबेन भूपेशभाई पटेल, उपनगराध्यक्षा संगिता देवरे, शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती के. डी. पाटील, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष अध्यक्ष देवेंद्र पाटील, श्री बालाजी संस्थानचे उपाध्यक्ष गोपाल भंडारी, सुभाष कुलकर्णी आदी उपस्थित होते. यावेळी आ. पावरा म्हणाले की, द्वेता पटेल यांनी पटेल परिवाराच्या सेवाभावी परंपरेचा आदर्श पुढे नेत अत्यंत कमी वयात गेल्या पाच वर्षांपासून आदिवासी व ग्रामीण भागात उल्लेखनीय सामाजिक कार्य सुरू ठेवले आहे. समाजात प्रत्येकामध्ये सेवाभाव निर्माण झाला पाहिजे. मोठ्यांची नेहमीच सेवा करण्याची सर्वांनी संस्कृती जपली पाहिजे, असेही त्यांनी सांगितले. एसव्हीकेएम संचलित तपनभाई मुकेशभाई पटेल मेमोरियल हॉस्पिटल अ‍ॅण्ड मेडिकल रिसर्च सेंटर व अस्तित्व सोशल वेलफेअर फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.

या अंतर्गत राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमातील नोंदणीकृत बालरुग्णांची तपासणी व मोफत शस्त्रक्रिया, क्षयरुग्णांना पोषण आहार किट वाटप तसेच ८०० ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित केले आहे. तपनभाई मुकेशभाई पटेल मेमोरियल हॉस्पिटल अँड मेडिकल रिसर्च सेंटर येथे राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम अंतर्गत नाव नोंदणी केलेल्या १०० बालरुग्णांची फिजीकल फिटनेस तपासणी करण्यात आली. या कार्यक्रम अंतर्गत सुमारे १०० बालरुग्णांची मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. शिरपूर, शिंदखेडा, दोंडाईचा, धुळे, साक्री, पिंपळनेर या तालुक्यातील क्षय (टी.बी.) रुग्णांना दि. २३ ते २७ मे २०२६ रोजी मोफत पोषण आहार किट वाटप होईल. दि.२५ व २६ मे रोजी सकाळी ९ वाजता नोंदणीकृत ८०० ज्येष्ठ नागरिकांची मोफत सामान्य आरोग्य तपासणी शिबीर तपनभाई मुकेशभाई पटेल मेमोरियल हॉस्पिटल, मेडिकल कॉलेज व रिसर्च सेंटर खर्दे बु. ता. शिरपूर येथे आयोजित करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन सुभाष कुलकर्णी यांनी केले.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक - सागर काशिनाथ ओतारी (मोबा.- ९९७००५३०६६) व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
✲ कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी (✲ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७-२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

## दिन विशेष...

१९०९ : मराठी वाङ्मयातील प्रसिध्द कथालेखक ग.ल. ठोकळ यांचा जन्म.

१९१६ : मराठीतील प्रसिध्द लेखक रंगनाथ मनोहर जोशी ऊर्फ निर्मळ गुरुजी यांचा जन्म.

१९४५ : महाराष्ट्राचे १४ वे मुख्यमंत्री स्व.विलासरावजी देशमुख यांचा जन्मदिन.

१९८३ : पोस्टल इंडेक्सचे जनक मानले जाणारे आर.व्ही. मराठे यांचे निधन.

१९८९ : मुंबई जवळच्या न्हावा शेवा या बंदराचे उद्‌घाटन झाले.

# जळगाव जिल्हा युवक काँग्रेसचे महागाईविरोधात आंदोलन

## नीट घोटाळ्यातील आरोपींना शिक्षा द्या; डिझेल-पेट्रोलच्या भाव वाढीचा निषेध

प्रतिनिधी । जळगाव

**नीट घोटाळ्यातील आरोपींना शिक्षा द्या; डिझेल-पेट्रोलच्या भाव वाढीचा निषेध करीत महागाईविरोधात जळगाव जिल्हा युवक काँग्रेसच्यावतीने शास्त्री टावर चौकात आंदोलन करण्यात आले.**

नीट घोटाळ्यामुळे त्रस्त झालेले विद्यार्थी तसेच पालक वर्गांना जे त्रास होत आहे त्याची जबाबदारी महाराष्ट्र सरकारने स्वीकारून परीक्षाला जाणारे विद्यार्थी व पालक यांना एसटी महामंडळमध्ये मुक्त प्रवास करण्याची सुविधा उपलब्ध करून द्यावी व बस भाडे माफ करावे. तसेच विद्यार्थ्यांना होणाऱ्या त्रासाबद्दल सरकारने माफी मागावी. या परीक्षांमध्ये भविष्य साकारण्यासाठी विद्यार्थी वर्षानुवर्ष अभ्यास करून मेहनत करून पुढे येण्याचा प्रयत्न करतात आणि ही चोर मंडळी हे पेपर फोडण्याचा काम करतात. त्यांना कळक शिक्षा झाली पाहिजे, अशी मागणी महानगर जिल्हाध्यक्षक जमील शेख यांनी केली आहे. तसेच भाजप सरकारने फक्त पहिल्यांदा दोन ते तीन रुपये जे दरवाढ केलेली आहे ते माध्यमाद्वारे लोकांना कळवलं. त्यानंतर प्रत्येक दिवशी एक ते दीड रुपयांनी डिझेल पेट्रोलवरचे भाव वाढ करण्यात येते आहे. तसेच पुरवठामध्ये अनिमत्ता आणि लोकांना भरपूर त्रास होत आहे. शासनाने लोकांचे या प्रश्नाकडे लक्ष देऊन योग्य ते नियोजन करावे, शेतकऱ्यांना शेती कामासाठी लागणारे डिझेल उपलब्ध करून देण्यासाठी योग्य ते निर्णय घ्यावे,आदी प्रश्नांसाठी जळगाव जिल्हा युवक काँग्रेसच्यावतीने शास्त्री टावर चौकात आंदोलन करण्यात आले.




तत्पूर्वी जळगाव जिल्हा युवक काँग्रेसची मासिक आढावा बैठक व आंदोलन उत्साहात पार पडली. यावेळी जळगाव महानगर काँग्रेस जिल्हाध्यक्ष जमील शेख हे अध्यक्षस्थानी होते. तर महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस महासचिव तथा जळगाव जिल्हा युवक काँग्रेसचे प्रभारी अभिलाष तायडे तसेच महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेस प्रदेश सचिव किरण पाटील, प्रदेश सचिव आशुतोष पवार, प्रदेश सचिव तुषार संदानशिव, युवक काँग्रेस जळगाव महानगर जिल्हाध्यक्ष मुजीब पटेल, जळगाव जिल्हा ग्रामीण युवक जिल्हाध्यक्ष महेश पाटील यांच्या नेतृत्वाखाली ही बैठक पार पडली. यावेळेस जमील शेख यांनी नीटची पुनःपरीक्षा देणाऱ्या विद्यार्थी व त्यांच्या पालकांचा प्रवासाचा खर्च सरकारने करावा यासाठी युवक काँग्रेसने जिल्ह्यात उठाव करावा अशी भूमिका मांडली. अभिलाष तायडे यांनी संघटन बळकटीसाठी लोकांमध्ये जाऊन लोकांची कामे करा, असा सल्ला युवकांना दिला. यावेळी किरण पाटील आणि आशुतोष पवार यांनी देखील युवकांना प्रोत्साहनपर मार्गदर्शन केले.

यावेळी बैठकीला जळगाव काँग्रेस महानगर जिल्हाध्यक्ष जमील शेख, प्रदेश सचिव किरण पाटील, प्रदेश सचिव आशुतोष पवार, प्रदेश सचिव तुषार संदानशिव, युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष महेश पाटील , जळगाव शहर युवक जिल्हाध्यक्ष मुजीब पटेल, जळगाव युवक काँग्रेस सचिव सलमान तडवी , जळगाव युवक काँग्रेस सचिव गौरव देशमुख , भुसावळ विधानसभा युवक अध्यक्ष नगरसेवक रोहन सुर्यवंशी , पाचोरा विधानसभा युवक काँग्रेस अध्यक्ष मनोहर महाले ,चाळीसगाव विधानसभा युवक अध्यक्ष प्रज्वल राजपूत,एरंडोल तालुकाध्यक्ष चेतन पाटील,यावल तालुकाध्यक्ष अनिल कोळी,अमळनेर तालुका ग्रामीण युवक काँग्रेस अध्यक्ष विकास पाटील, धरणगाव युवक चे योगेश येवले, धरणगाव माजी शहराध्यक्ष गौरव चव्हाण, भडगाव शहराध्यक्ष गोविंद देशमुख, चोपडा शहराध्यक्ष माजित तडवी आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## थोडक्यात

### निवासी डॉक्टरांसाठी हेपेटायटिस लसीकरण शिबीर

**जळगाव ।** रुग्णसेवेत दिवस-रात्र कार्यरत असणाऱ्या निवासी डॉक्टरांच्या आरोग्य सुरक्षेसाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव येथे एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले. महाराष्ट्र असोसिएशन ऑफ रेसिडेंट डॉक्टर्स आणि जनऔषधवैद्यकशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने निवासी डॉक्टर आणि इंटर्नसाठी दि. १८ ते २२ मे दरम्यान मोफत हेपेटायटिस-बीफ लसीकरण मोहिमेचे आयोजन केले होते. या मोहिमेत सुमारे १०० हून अधिक निवासी डॉक्टर आणि इंटर्न यांनी या लसीकरणाचा लाभ घेतला.याप्रसंगी अधिष्ठाता डॉ.गिरीश ठाकूर, वैद्यकीय अधीक्षक डॉ. योगिता बाविस्कर उपस्थित होते.

### तंबाखू विरोधी दिनानिमित्त ३० रोजी जनजागृती

**जळगाव ।** जागतिक तंबाखू विरोधी दिनाचे (३१ मे) औचित्य साधून शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव यांच्यावतीने ३० मे रोजी सकाळी १०:३० वाजता शासकीय बस स्थानक, जळगाव येथे एका विशेष जनजागृती मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. या मोहिमेचा मुख्य उद्देश प्रवाशांमध्ये आणि जळगावकरांमध्ये तंबाखू सेवनाचे वैयक्तिक आरोग्यावर व समाजावर होणारे घातक परिणाम सांगून, त्याविषयी नैतिक आणि सामाजिक जाणीव निर्माण करणे हा आहे. तंबाखू आणि गुटख्यामुळे होणाऱ्या तोंडाच्या कर्करोगासारख्या गंभीर आजारांबद्दल नागरिकांना जागरूक करत, त्यांना व्यसनमुक्त आयुष्य जगण्याची प्रेरणा देणे हा या उपक्रमाचा मुख्य हेतू असून महाविद्यालयाने सर्वांना यात सहभागी होण्याचे आवाहन डॉ सिद्धार्थ चौधरी यांनी केले आहे.

# होमगार्ड जवान सुरेश माळींचा सेवानिवृत्तीनिमित्त गुणगौरव

प्रतिनिधी । धरणगाव

**तब्बल २८ वर्षे महाराष्ट्र होमगार्ड संघटनेत निष्ठेने व प्रामाणिकपणे सेवा बजावणारे धरणगाव होमगार्ड पथकातील जवान सुरेश झगा माळी हे सेवानिवृत्त झाले. त्यांच्या दीर्घ व उल्लेखनीय सेवेला मानवंदना देण्यासाठी धरणगाव येथील प.रा. विद्यालयात भावपूर्ण निरोप समारंभ व गुणगौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.**

याप्रसंगी होमगार्ड तालुका समादेशक ईश्वर महाजन यांच्या हस्ते सुरेश माळी यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि प्रशस्तीपत्र प्रदान करून सन्मान करण्यात आला. उपस्थितांनी त्यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या सेवाभावी वृत्तीचे कौतुक केले.

सुरेश माळी यांनी सन १९९८ मध्ये होमगार्ड सेवेत प्रवेश केला होता. सेवाकाळात त्यांनी जिल्ह्यातील तसेच परजिल्ह्यातील विविध महत्त्वाच्या जबाबदाऱ्या अत्यंत प्रामाणिकपणे पार पाडल्या.



याशिवाय राज्याबाहेरील काही विशेष कर्तव्यांमध्येही त्यांनी उल्लेखनीय योगदान दिले.

कठीण परिस्थितीतही शिस्त, जबाबदारी आणि कर्तव्यनिष्ठा यांचा आदर्श त्यांनी कायम जपला. निरोप समारंभादरम्यान सुरेश माळी यांच्या सेवाकाळातील अनेक आठवणींना उजाळा देण्यात आला. त्यांच्या सहवासातील प्रसंग सांगताना अनेक सहकाऱ्यांच्या भावना अनावर झाल्या आणि वातावरण काही क्षण भावूक झाले. यावेळी पथकातील पलटण नायक ईश्वर पाटील, अं. लिपिक जानकीराम पाटील, अनिल सातपुते, भिकन लोहार, आत्माराम चौधरी, रमाकांत बाविस्कर, पुरुषोत्तम वाणी, हर्षल सावंत, भगवान महाजन, सुदर्शन पाटील, प्रल्हाद महाजन तसेच माजी प. नायक अशोक देशमुख, प्रताप वराडे, किरण मिसर, दीपक पाटील, गणेश सावंत, रेखा चौधरी, लता वाणी, अनिता शिरसाठ, अनिल महाजन यांच्यासह मोठ्या संख्येने होमगार्ड जवान, आप्तेष्ट, नातेवाईक आणि मित्रपरिवार उपस्थित होते.

सुरेश माळी यांच्या प्रदीर्घ सेवेमुळे होमगार्ड दलाला मिळालेले योगदान हे निश्चितच प्रेरणादायी असून त्यांच्या आगामी आयुष्यासाठी उपस्थितांनी शुभेच्छांचा वर्षाव केला.

### चौघांवर तडीपारीची कारवाई; जिल्ह्यात प्रवेशबंदी

प्रतिनिधी । जळगाव

कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी जळगाव शहर व जामनेर येथील चार जणांवर तडीपारीची कारवाई करण्यात आली असून त्यांना एक वर्षासाठी जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले आहे. उपविभागीय दंडाधिकारी विनय गोसावी यांनी याबाबतचे आदेश जारी केले असून, संबंधितांना सक्षम अधिकाऱ्यांच्या लेखी परवानगीशिवाय जिल्ह्यात प्रवेश करता येणार नाही.

## शेतकऱ्यांना कॅनमध्ये डीझेल देण्यास मनाई; मनसे आक्रमक

प्रतिनिधी । जळगाव

**शहरासह जिल्ह्यातील पेट्रोलपंपांवर ऑनलाइन पेमेंट स्वीकारा तसेच शेतकऱ्यांना कॅनमध्ये डीझेल देण्यास मनाई करीत असल्याने मनसे आक्रमक झाली आहे.**

जिल्ह्यात पेट्रोल व डिझेल टंचाईची परिस्थिती निर्माण झाली असून वाहन चालक, शेतकरी, सर्वसामान्य नागरिकांना त्रासाला सामोरे जावे लागत आहे. अनेक



पेट्रोलपंपांवर नागरिकांना चार ते पाच तास रांगेत उभे राहून इंधन मिळवावे लागत आहे. अनेक पेट्रोल पंप चालकांकडून ऑनलाइन पेमेंट स्वीकारण्यास नकार दिला जात आहे. यावेळी पुरवठा अधिकारी महेश चौधरी यांना निवेदन दिले. याप्रसंगी ॲड. जमील देशपांडे, उपमहानगराध्यक्ष श्रीकृष्ण मेंगडे, ललित शर्मा, राजेंद्र निकम, प्रकाश जोशी, महिला शाखाध्यक्ष अध्यक्ष अनिता कापुरे. लक्ष्मी बिल, राहुल चव्हाण. राजेश मराठे, बादशहा शहा उपस्थित होते.

## धरणगावची अनन्या बाजपेयी तेजस्वी शास्त्रज्ञ पुरस्काराने सन्मानित

प्रतिनिधी । धरणगाव

**येथील अनन्या आनंद बाजपेयी हिला डॉ. होमी भाभा फाऊंडेशनचा तेजस्वी तरुण शास्त्रज्ञ पुरस्कार अर्थात स्पायरिंग यंग सायंटिस्ट अवॉर्ड्सने यशवंतराव चव्हाण सेंटर, मुख्य सभागृह, मरीन लाइन्स, मुंबई येथे मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मानित करण्यात आले. अनन्या हिला स्मृतीचिन्ह, सन्मानपत्र, ग्रंथ, पुष्पगुच्छ देवून सन्मानित करण्यात आले.**




महाराष्ट्र राज्यातील सर्वात तेजस्वी तरुण शास्त्रज्ञांच्या निवडीसाठी एक स्पर्धा परीक्षा घेण्यात आली होती. त्यात टोळी येथील सेंट मेरी पब्लिक स्कूलची विद्यार्थिनी अनन्या आनंद बाजपेयी हिने उत्कृष्ट कामगिरी केल्याच्या गौरवार्थ या पुरस्कार सोहळ्यात तिला सन्मानित करण्यात आले. अनन्या हीचे यश प्रतिभावान विद्यार्थ्यांना प्रेरणा आणि प्रोत्साहन देणारे असून, भविष्यातील वैज्ञानिक घडविण्याची ती पहिली पायरी आहे, असे मान्यवरांनी म्हटले. अनन्या बाजपेयी हिला तिच्या शाळेचे प्राचार्य, शिक्षक, आई तृप्ती बाजपेयी, वडिल आनंद बाजपेयी, काकू नेहा बाजपेयी आणि काका निलेश बाजपेयी यांचे मार्गदर्शन लाभले.

भविष्यात विज्ञान आणि तंत्रशिक्षणात उच्चशिक्षित होवून देशाच्या वैज्ञानिक प्रकल्पात सेवा करण्याची ईच्छा अनन्या हिने व्यक्त केली. तिच्या या यशाचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# लायन्स क्लबच्या मोफत हाडे-सांधे तपासणी शिबिरात १०५ रुग्णांनी घेतला लाभ

प्रतिनिधी । अमळनेर

**लायन्स क्लब ऑफ अमळनेर यांच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या मोफत हाडे व सांधे आरोग्य तपासणी शिबिरास नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. न्यू प्लॉट परिसरातील प्राजक्ता क्लिनिक येथे दि. २४ मे सकाळी ८ ते दुपारी २ वाजेदरम्यान हे शिबिर उत्साहात पार पडले.**

या शिबिरात हाडे व सांधे विकार तज्ज्ञ डॉ. संदीप सुरेश पाटील यांनी रुग्णांची तपासणी करून मार्गदर्शन केले. डॉ. पाटील यांनी मुंबईतील व्ही. एन. देसाई



व एमसीजीएम रुग्णालयात विभागप्रमुख म्हणूनही उल्लेखनीय सेवा बजावली आहे.

या शिबिरादरम्यान सांधे प्रत्यारोपण, गुडघे व खांदा प्रत्यारोपण, दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया तसेच कंबरदुखी यांसारख्या समस्यांबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. आधुनिक व रोबोटिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने होणाऱ्या शस्त्रक्रियांविषयीही मार्गदर्शन करण्यात आले. तसेच रुग्णांच्या विविध शंकांचे समाधान केले. या शिबिराचा लाभ अमळनेर तालुक्यासह पारोळा, चोपडा,नरडाणा, शिंदखेडा परिसरातील तब्बल १०५ रुग्णांनी घेतला. यावेळी लायन्स क्लबचे अध्यक्ष ला. डॉ. संदीप जोशी, सचिव महेंद्र पाटील, कोषाध्यक्ष नितीन बिंचूरकर, प्रोजेक्ट चेअरमन शेखर धनगर, डॉ. धीरज कोकाटे, राजेश कुंदनानी, डॉ. मिलिंद नवसारीकर, रवींद्र कॉलरा, प्रशांत सिंघवी, रवींद्र जैन, निरज अग्रवाल, प्रदीप जैन, प्रदीप अग्रवाल, सुनील चौधरी, एस.डी.भरुचा, डॉ.किशोर शहा, योगेश मुंदडा, डॉ. रवींद्र कुलकर्णी, शाम गोकलानी, राजेश वरलानी,प्रा.नयना नवसारीकर उपस्थित होते. यशस्वीतेसाठी लायन्स क्लबच्या पदाधिकाऱ्यांनी व सदस्यांनी परिश्रम घेतले.

## देवस्थानच्या जमिनी वहिवाटदारांना देण्याचा प्रस्तावित कायदा रद्द करा




प्रतिनिधी । जळगाव

**महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागाकडून देवस्थान इनाम जमिनी आणि मंदिरांच्या अन्य जमिनी कुळांना किंवा वहिवाटदारांना हस्तांतरित करण्यासाठी नवीन कायदा प्रस्तावित येत आहे. महाराष्ट्र मंदिर महासंघाने या धोरणाला कडाडून विरोध दर्शवला असून, हा हिंदू देवस्थानांचे अस्तित्व संपवण्याचा आणि भूमाफियांचे खिसे भरण्याचा डाव तर नाही ना, अशी रास्त शंका निर्माण होत आहे. शासनाने हा बेकायदेशीर आणि अन्यायकारक मसुदा तात्काळ मागे घ्यावा. अन्यथा राज्यभर मंदिरांच्या वतीने तीव्र जनआंदोलन छेडू, असा इशारा महाराष्ट्र मंदिर महासंघाचे राष्ट्रीय संघटक सुनील घनवट यांनी जळगाव येथील आयोजित पत्रकार परिषदेत दिला आहे.**


यावेळी सनातन संस्थेचे धर्मप्रचारक सदगुरू नंदकुमार जाधव, स्वामी नारायण मंदिराचे नयन स्वामी महाराज, नागाई जोगाई माता मंदिराचे विश्वस्त दिनेश सोनवणे, मनुदेवी मंदिराचे विश्वस्त निळकंठ चौधरी, हिंदु जनजागृती समितीचे विनोद शिंदे उपस्थित होते. सुनील घनवट म्हणाले की, भारतीय कायद्यानुसार हिंदू देवता (मूर्ती) ही एक कायदेशीर व्यक्ती आहे. त्यामुळे देवस्थानच्या मालमत्तेचा मूळ मालक देव असतो आणि महाराष्ट्र राज्य सरकार, प्रामुख्याने महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये, नियामक, प्रशासकीय आणि आर्थिक अधिकारांच्या माध्यमातून सार्वजनिक मंदिरांवर नियंत्रण ठेवते. विश्वस्तांना व शासनाला देवस्थानांच्या मूळ मालकाची जमीन परस्पर त्रयस्थांना किंवा वहिवाटदारांना वाटण्याचा कोणताही अधिकार नाही. सर्वोच्च आणि उच्च न्यायालयांच्या प्रस्थापित निकालांनुसार देवस्थान जमिनींवर कुळांना मालकी हक्क सांगता येत नाही. असे असतानाही हा कायदा आणणे म्हणजे संविधानाच्या कलम २५, २६ आणि ३००-अ मधील मूलभूत अधिकारांचे थेट उल्लंघन आहे, असे घनवट यांनी सांगितले.

# चाळीसगाव ते रायगड मोहिमेसाठी १५०० विद्यार्थ्यांनी दिली प्रवेश परीक्षा

प्रतिनिधी । चाळीसगाव

**चाळीसगावचे आमदार मंगेश चव्हाण यांच्या संकल्पनेतून आणि शिवनेरी फाउंडेशन आयोजित रायगड मोहिम -२०२६ प्रवेश परीक्षा दि. २४ मे रोजी तेली समाज मंगल कार्यालय, एम.जी. नगर, चाळीसगाव येथे अत्यंत शिस्तबध्द पध्दतीने संपन्न झाली.**

या परीक्षेत जवळपास १५०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. तरुणाईच्या उत्स्फूर्त उपस्थितीमुळे परीक्षा परिसराला यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते. छत्रपती शिवाजी महाराज यांचे जीवनचरित्र, शिवकालीन इतिहास, प्रशासन, युद्धनीती तसेच स्वराज्याच्या विचारांवर आधारित ५० प्रश्न परीक्षेत विचारण्यात आले



होते. रायगड मोहिमेचे हे सहावे वर्ष असून प्रवेश परीक्षेचे हे दुसरे वर्ष आहे. शिवाजी महाराजांचा नुसता जयजयकार न होता त्यांच्या विचारांचे आचरण तरुणांच्या जीवनात व्हावे, शिवइतिहासाचा अभ्यास वाढावा व विद्यार्थ्यांना त्यांच्या चरित्रातून प्रेरणा मिळावी या उद्देशाने ही परीक्षा आयोजित करण्यात आल्याचे शिवनेरी फाउंडेशनच्या अध्यक्षा तथा चाळीसगाव शहराच्या लोकनियुक्त नगराध्यक्षा प्रतिभा चव्हाण यांनी सांगितले. जास्तीत जास्त तरुणांना रायगड मोहिमेत सहभागी करून घेण्यात येणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

उत्तरपत्रिका तपासणीनंतर यशस्वी झालेल्या पहिल्या १००० विद्यार्थ्यांना दि.५ जून ते ७ जून या कालावधीत आयोजित रायगड मोहिमेत सहभागी होण्याची संधी दिली जाणार असून रायगडावरील शिवराज्याभिषेक सोहळ्याचे साक्षीदार होता येणार आहे. परीक्षा कालावधीत लोकनियुक्त नगराध्यक्षा प्रतिभा चव्हाण यांनी पूर्णवेळ उपस्थित राहत विद्यार्थ्यांशी संवाद साधला व त्यांना शुभेच्छा दिल्या.

ही परीक्षा यशस्वी पार पाडण्यासाठी भाजपा शिक्षक आघाडी, भाजपा युवा मोर्चाचे पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच आ. मंगेश चव्हाण अंत्योदय जनसेवा कार्यालयातील स्वयंसेवक यांनी विशेष परिश्रम घेतले.

### शहरातील प्रमुख रस्त्यांची डागडुजी करा : महापौर

प्रतिनिधी । जळगाव

पावसाळा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपल्याने शहरातील रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे नागरिकांना नाहक त्रास होऊ नये. शहरातील सर्व प्रमुख रस्त्यांची डागडुजी आणि खड्डे बुजविण्याचे काम पावसाळा सुरू होण्यापूर्वी तात्काळ पूर्ण करावे, असे निर्देश महापौर दीपमाला काळे यांनी मनपा प्रशासनाला दिले आहेत. महापौरांच्या या निर्देशानंतर शहर अभियंत्यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिकेतर्फे रस्ता डागडुजीच्या कामांना दि. २६ मेपासून सुरुवात करण्यात येत आहे. दरवर्षी पावसाळ्यात शहरातील रस्त्यांवर खड्डे पडल्यामुळे वाहनधारकांना मोठ्या प्रमाणावर मनस्ताप सहन करावा लागतो.

# अमळनेरची १९४.५४ कोटींची पाणीपुरवठा योजना प्रगतिपथावर

## आ.अनिल पाटील यांनी केली पाहणी; विकासासाठी नगराध्यक्ष डॉ. बाविस्कर यांची नगरसेवकांसह उपस्थिती

प्रतिनिधी । अमळने

**शहराचे जलसंकट कायमस्वरूपी दूर करण्यासाठी आमदार अनिल पाटील यांच्या प्रयत्नांनी मंजूर झालेल्या १९४.५४ कोटींच्या पाडळसरे धरणावरील नवीन २४X७ पाणीपुरवठा योजनेचे काम प्रगतिपथावर आहे. रविवार दि. २४ मे रोजी माजी मंत्री तथा आमदार अनिल भाईदास पाटील यांनी असंख्य कार्यकर्त्यांसह प्रत्यक्षस्थळी भेट देऊन कामाची पाहणी केली व सद्यस्थितीचा आढावा घेतला.**

विशेष म्हणजे शहराच्या विकासासाठी शिवसेना शिंदे गटाचे लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉ.परीक्षित बाविस्कर यांनीही यावेळी आपल्या नगरसेवकांसोबत उपस्थिती लावल्याने शहराच्या विकासासाठी आमदार आणि नगराध्यक्ष एकत्र असल्याचे संकेत मिळाले. आमदार अनिल पाटील सकाळी ७:३० वाजताच शहर विकास आघाडीचे नगरसेवक व कार्यकर्त्यांच्या ताफ्यासह पाडळसरे धरणावर पोहोचले. त्यांच्यासोबत





नगराध्यक्ष डॉ. बाविस्करही नगरसेवकांसह उपस्थित झाले. पाडळसरे नजीक तापी नदीच्या काठी सुरू असलेल्या कामाच्या स्थळी दोघांनी भेट दिली.

याठिकाणी १ इंटेकवेल, ३ इन्फेक्शन वेल, १ जॅकवेल आणि कनेक्टिंग मेनचे काम जोमाने सुरू आहे. सदरचे काम २० टक्क्यांपेक्षा अधिक पूर्ण झाले असून कामाला गती देण्याच्या सूचना आमदारांनी केल्या. नगराध्यक्षांनीही काही सूचना यावेळी केल्या.तांत्रिक बाजूही त्यांनी जाणून घेतल्या.

याप्रसंगी न.प.चे मुख्याधिकारी गणेश शिंदे, न.प. अभियंता बैसाणे, मानव सेवा कन्सल्टंट धुळेचे राजेंद्र सोनार व विवेक पाटील, ठेकेदार जितेश ठाकरे व राज राठोड उपस्थित होते. त्यांनी संपूर्ण कामाचा आढावा दिला. दोन वर्षांपूर्वी १९४.५४ कोटींची ही २४७ योजना आमदार अनिल पाटील यांच्या अथक प्रयत्नांनी मंजूर झाली. पाडळसरे धरणावर वर्षभर जलसाठा राहत असल्याने ही योजना अमळनेर शहरासाठी जलरक्षक ठरणार असून योजना पूर्ण झाल्यानंतर शहरवासीयांना दररोज पाणी मिळणार आहे. सदर योजनेचे जवळपास ३५ टक्क्यांहून अधिक काम पूर्ण झाले आहे. शहरात २११.५ किमीपैकी ९२ किमीहून अधिक पाईपलाईन टाकण्यात आली

**यंदाच्या उन्हाळ्यात अमळनेरकरांना पाणीटंचाईची झळ बसल्याने ही योजना लवकरात लवकर पूर्णत्वास यावी, यासाठी आमदार अनिल पाटील यांचे प्रयत्न सुरू आहेत. त्याच उद्देशानेच आमदारांनी हा विशेष पाहणीचा दौरा केला. यावेळी कामाची प्रगती पाहून नगराध्यक्ष व नगरसेवकांनी समाधान व्यक्त केले.**

आहे. ढेकू रोडवरील नवनाथ टेकडीवर २८ एमएलटी क्षमतेचे जलशुद्धीकरण केंद्र उभारले जात आहे. याचेही काम ४० टक्के पूर्ण झाले आहे. याशिवाय १८.६० लक्ष लिटर व १९.५८ लक्ष लिटर क्षमतेच्या मोठ्या जलकुंभांचे कामही प्रगतिपथावर आहे. या योजनेत सोलर प्रोजेक्टची तरतूद असल्याने वीज बिलातही मोठी बचत होणार आहे. याप्रसंगी नगरसेवक, नगरसेविका, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुकाध्यक्ष, शहराध्यक्ष, शहर व ग्रामिण पदाधिकारी, कार्यकर्ते व हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## थोडक्यात

### किसान मोर्चा अध्यक्षपदी नितीन पाटील यांची निवड

**अमळनेर ।** तालुक्यातील ढेकू येथील नितीन आधार पाटील यांची भारतीय जनता पार्टी जानवे मंडळ किसान मोर्चा अध्यक्षपदी नुकतीच निवड करण्यात आली. ही निवड त्यांच्या नेतृत्वगुणामुळे, कार्यकर्त्यांशी असलेल्या जिव्हाळ्याच्या नात्यामुळे व पक्षाप्रती असलेल्या निष्ठेमुळे त्यांना ही महत्त्वाची जबाबदारी मिळाली आहे. त्यांची ही निवड किसान मोर्चाचे तालुकाध्यक्ष जिजाबराव आत्माराम पाटील यांनी केली. त्यांच्या नेतृत्वाखाली कार्य अधिक जोमाने वाढेल व पक्ष संघटन अधिक बळकट होईल, असेही त्यांनी मत व्यक्त केले आहे. नितीन पाटील यांच्या निवडीमुळे सर्वत्र अभिनंदन होत आहे. खासदार स्मिता वाघांसह अनेकांनी अभिनंदन केले आहे.

### ढगाळ वातावरणाने नागरिकांना दिलासा

**जळगाव ।** शहरात सध्या उन्हाने थैमान घातले असून यामुळे अबालवृद्धांसह चिमुकल्यांनाही त्रास सहन करावा लागत आहे. दरम्यान, दि. २४ रोजी दुपारी शहरात ढगाळ वातावरण निर्माण झाल्याने नागरिकांना काहीसा दिलासा मिळाला आहे. दुपारी वारा सुटल्याने पाऊस पडतो की काय, अशी आशा निर्माण झाली होती. मात्र, केवळ वातावरणात किंचितसा गारवा निर्माण झाल्यानेही नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार)तर्फे इंधन दरवाढीविरोधात तीव्र आंदोलन



प्रतिनिधी । वरणगाव

**देशात आणि राज्यात सातत्याने होणाऱ्या इंधन दरवाढीच्या विरोधात वरणगाव येथे राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार)तर्फे तीव्र निदर्शने करण्यात आली. केंद्र आणि राज्य सरकारच्या जनविरोधी धोरणांमुळे सर्वसामान्य नागरिक, शेतकरी आणि मध्यमवर्गीय होरपळून निघत असल्याचा आरोप यावेळी आंदोलकांनी केला. महागाईने सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले आहे.**

इंधनाचे दर वाढल्याने वाहतूक खर्च वाढून जीवनावश्यक वस्तूही महागल्या आहेत. सरकारने तात्काळ ही दरवाढ मागे घ्यावी, अशी मागणी स्थानिक पदाधिकाऱ्यांनी केली. सदर आंदोलनात राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हा उपाध्यक्ष दीपक मराठे, राष्ट्रवादी काँग्रेस महिला जिल्हा उपाध्यक्ष प्रतिभा तावडे, शहराध्यक्ष प्रा.राहुल जोहरे, युवा अध्यक्ष कुलदीप देशमुख, नगरसेवक नाना चौधरी, इरफान सय्यद, काँग्रेस जिल्हा सरचिटणीस प्रा.मनोज देशमुख, सुनील भोई शिवसेना शहराध्यक्ष, अशपाक काझी काँग्रेस शहराध्यक्ष, जुनेद शाह, जिशान खान, डॉ. आहेसान, शोएब खाटिक, दीपक निळे, अशोक पाटील, सचिन पाटील, जितू तावडे, मनोज दिनकरराव देशमुख, आयुष पाटील यांच्यासह सर्व कार्यकर्ते, गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शहरातील मान्सूनपूर्व कामांना गती द्या

प्रतिनिधी । पाचोरा

येथील पाचोरा नगरपरिषदेचे नगरसेवक तथा गट नेते सूरज संजय वाघ यांनी मागील वर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे शहरातील नागरिकांना मोठ्या संकटांचा सामना करावा लागला होता. या पार्श्वभूमीवर यंदा पावसाळ्यापूर्वीच सर्व आवश्यक उपाययोजना युद्धपातळीवर राबविण्यात याव्यात, अशी जोरदार मागणी निवेदनाद्वारे पाचोरा नगर परिषद प्रशासनाकडे केली आहे. निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, शहरातील नालेसफाई, भुयारी गटारींची स्वच्छता तसेच उघड्या गटारींची तातडीने साफसफाई करण्यात यावी. विशेषतः कॉलनी परिसर, व्यापारी पेठ आणि दाट न.पा. गटनेते सूरज संजय वाघ यांची मागणी लोकवस्तीच्या भागांमध्ये पाणी साचणार नाही. यासाठी प्रशासनाने आतापासूनच नियोजनबद्ध उपाययोजना करणे अत्यंत आवश्यक आहे. मागील वर्षी नाले व गटारी वेळेत साफ न झाल्यामुळे अतिवृष्टीदरम्यान शहरातील अनेक भाग जलमय झाले होते. मुख्य रस्त्यांवर पाणी साचल्याने वाहतूक विस्कळीत झाली होती, तर भुयारी मार्गांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने काही दिवस भुयारी मार्ग बंद ठेवावा लागला होता, नागरिकांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागला होता. अनेक वसाहतींचा प्रमुख बाजारपेठेशी संपर्क तुटला होता.

# बोहल्यावर चढण्याआधीच भावी नवरदेवाचा ट्रॅक्टरखाली येऊन मृत्यू

प्रतिनिधी । यावल



**तालुक्यातील दहिगाव येथील २८ वर्षीय तरुणाचा रोटावेटर करीत असताना ट्रॅक्टरच्या पुढील चाकात पडून मृत्यू झाल्याची घटना शनिवारी दि. २३ रोजी दुपारी घडली. या घटनेमुळे दहिगाव परिसरात एकच हळहळ व्यक्त होत आहे.**

तरुणाचे लग्न १८ जून रोजी पार पडणार होते. मात्र लग्नाआधीच त्याला मृत्यूने कवटाळले. याबाबत यावल पोलिसात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. दहिगाव येथील योगेश यशवंत पाटील (वय २८) हा दि. २३ रोजी बबलू उर्फ शोभराज रमेश महाजन यांचे मोहराळे शेतात ट्रॅक्टरने रोटावेटर करण्यासाठी गेला होता. रोटावेटर करीत असताना त्याचा अचानक तोल जाऊन तो ट्रॅक्टरच्या मोठ्या चाकाखाली सापडून रोटावेटरमध्ये अडकून जागीच ठार झाला. ट्रॅक्टर सुरूच होते. ते सरळ शेजारील शेतात जाऊन पोहोचले. हे दृश्य त्याच शेतात निंबाच्या झाडा खाली बसलेल्या एका तरुणाने बघितले आणि तो त्या दिशेने धावत गेला व ट्रॅक्टर बंद केले. तत्काळ त्याने त्याच्या वडिलांना भ्रमण दूरध्वनीवरून संपर्क केला. त्याचे वडील व नातेवाईक त्वरित तिथे दाखल झाले आणि त्याला त्या परिस्थितीत यावल येथील ग्रामीण रुग्णालयात आणले. यावल ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी डॉ.भोईटे यांनी त्याला मृत घोषित केले. त्याची शवविच्छेदन करण्यात आले. याबाबतची खबर यावल पोलिसात राजेंद्र यशवंत पाटील यांनी दिल्यावरून अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे, मृत योगेश पाटील याचा विवाह १८ जून रोजी होणार होता. पण काळाने त्याच्यावर झडप मारल्याने त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला या मृत्यूमुळे गावात हळहळ व्यक्त होत आहे.

# भुसावळात आरपीएफचा ऑपरेशन रेल प्रहरी अंतर्गत १८ लाखांच्या मोबाईल चोरीचा पर्दाफाश

प्रतिनिधी । भुसावळ

**भुसावळ मंडलात रेल्वे सुरक्षा दलाने मोठी आणि धडाकेबाज कारवाई करत ऑपरेशन रेल प्रहरी अंतर्गत आंतरराज्यीय चोरी प्रकरणाचा पर्दाफाश केला आहे. केरळमधील कन्नूर येथील मोबाईल शॉपमधून झालेल्या लाखो रुपयांच्या चोरीतील चार फरार आरोपींना ट्रेन क्रमांक १२६१७ मधून अटक करण्यात आली आहे. ही कारवाई अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने करण्यात आली.**



२२ मे २०२६ रोजी कन्नूर ग्रामीण पोलीस अधीक्षक आयपीएस अनुज यांनी भुसावळ मंडल नियंत्रण कक्षाला माहिती दिली होती की, चोरीतील आरोपी रेल्वे मार्गाने पळ काढत आहेत. माहिती मिळताच वरिष्ठ मंडल सुरक्षा आयुक्तांच्या निर्देशानुसार आर पी एफ भुसावळ स्टेशन व लोको टीम पूर्णपणे अलर्ट झाली. ट्रेन भुसावळ स्थानकावर पोहोचण्यापूर्वीच विशेष सर्च ऑपरेशन सुरू करण्यात आले. उपनिरीक्षक सुदामा यादव, उपनिरीक्षक श्याम यादव, टीम, भुसावळचे आरक्षक कपिल कुमार तसेच ड्युटीवरील जवानांनी प्लॅटफॉर्म क्रमांक ५ वर आलेल्या ट्रेनच्या प्रत्येक डब्याची बारकाईने तपासणी केली.

# मोटारसायकलला एसटीचा कट लागल्याने यावल डेपोमध्ये दांगडो

प्रतिनिधी । यावल

**चोपडा– यावल रोडवर फॉरेस्ट नाक्याजवळ एसटीच्या ड्रायव्हरने कट मारल्याच्या कारणावरून एसटी डेपोमध्ये येऊन तिघा आरोपींच्या अज्ञात दोघांनी गैर कायद्याची मंडळी जमून शासकीय कर्तव्य जागी असताना अटकाव करून चापटा बक्क्यांनी मारहाण करून शिवीगाळ केली. तुम्ही एसटी कशा चालवतात? अशी धमकी दिल्याप्रकरणी यावल पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



यामुळे एसटीच्या कर्मचाऱ्यांनी अचानक काम बंद पुकारून तीन तास एसटी बंद ठेवून यावल पोलीस स्टेशन मध्ये जाऊन संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात आल्यामुळे यावल शहरात एकच खळबळ उडाली आहे. यावल एसटी डेपोची धुळे ते यावल एमएचे ०६ बीडब्ल्यु ०८५४ ड्रायव्हर रफिक मुस्तफा शेख हे चोपड्याकडून यावलकडे येत असताना फॉरेस्ट नाक्याजवळ १२.३० वाजेच्या सुमारास यावलकडून एक मोटार सायकल बसच्या समोर अचानक आली. बस ड्रायव्हरने गाडी बाजूला वळवली. तेव्हा मोटार सायकल चालक इसमाने त्यांना शिवीगाळ केली. त्या ठिकाणी सदरचा किस्सा आपसात मिटला व पुन्हा एसटी आगारात महेंद्र मनोहर सोनवणे, जितेंद्र मनोहर सोनवणे, वैशाली जितेंद्र सोनवणे, (रा.पंचशील नगर) यांनी येऊन गैर कायद्याची मंडळी जमवून फिर्यादी रफीक मुस्तफा शेख ड्रायव्हर व सुनील रमेश कोळी हे शासकीय काम करीत असताना त्यांचा अटकाव करून चापटा बुक्क्यांनी मारहाण करून शिवीगाळ केली व तुम्हाला जास्त झाल आहे. साल्यांना तुम्ही आता बस कशी चालवतात? तुम्हाला बघतो? अशी धमकी दिली. या कारणावरून यावल पोलीस स्टेशन मध्ये फिर्यादी ड्रायव्हर रफिक मुस्तफा शेख यांच्या फिर्यादीवरून यावल पोलीस स्टेशनमध्ये महेंद्र मनोहर सोनवणे, जितेंद्र मनोहर सोनवणे, वैशाली जितेंद्र सोनवणे आणि दोन अनोळखी व्यक्ती राहणार पंचशिल नगर यावल यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यावल एसटी डेपोच्या कर्मचाऱ्यांनी झालेल्या घटनेचे व्हिडिओ चित्रण मोबाईलमध्ये व्हिडिओ काढत होते. तेव्हा वरील तिघ आरोपींनी देखील शिवीगाळ केली.

# पारोळा नगरपालिकेच्या नवीन अद्ययावत अग्निशमन गाडीचे लोकार्पण

## आमदार अमोल पाटील यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश

प्रतिनिधी । पारोळा

**शहराच्या सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणारी नवीन अद्यावत अग्निशमन गाडी (फायर फायटर) शासनाकडून पारोळा नगरपालिकेला प्राप्त झाली असून लोकप्रिय आमदार ॲड. अमोल पाटील यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे ही गाडी मंजूर करण्यात आली आहे.**

शहरातील वाढती लोकसंख्या, विस्तारत चाललेला नागरी परिसर तसेच आपत्कालीन परिस्थितीत तातडीने मदत पोहोचविण्याची गरज लक्षात घेता ही अग्निशमन गाडी पारोळा शहरासाठी मोठी दिलासादायक बाब मानली जात आहे. आग लागणे, शॉर्टसर्किट, अपघात तसेच इतर आपत्कालीन घटनांमध्ये तत्काळ प्रतिसाद देण्यासाठी आधुनिक सुविधांनी सुसज्ज असलेली ही अग्निशमन गाडी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. यामुळे पारोळा नगरपालिकेच्या अग्निशमन विभागाची कार्यक्षमता वाढण्यास मदत होणार आहे. शहरातील नागरिकांच्या सुरक्षेला अधिक बळ मिळणार आहे. अनेक दिवसांपासून शहरासाठी अद्ययावत अग्निशमन वाहनाची आवश्यकता असल्याची मागणी नागरिकांकडून होत होती. अखेर आ.ॲड.अमोल पाटील यांच्या



प्रयत्नांना यश मिळाल्याने नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, या नवीन अग्निशमन गाडीचे लोकार्पण व पूजन समारंभ आ. ॲड. अमोल पाटील यांच्या संपर्क कार्यालयात त्यांच्या शुभहस्ते तसेच लोकनियुक्त नगराध्यक्ष चंद्रकांत पाटील यांच्या प्रमुख उपस्थित उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या प्रसंगी शिवसेना शहरप्रमुख, गटनेते तथा नगरसेवक अमृत चौधरी, उपजिल्हाप्रमुख तथा नगरसेवक मनिष पाटील, बाळासाहेब पाटील, मा. उपनगराध्यक्ष सुदाम चौधरी, शिवसेना प्रतोद नितीन सोनार, नगरसेवक राजू कासार, मनोज जगदाळे, प्रमोद कासार, राजेंद्र पाटील, बापू मिस्तरी, उपगटनेता तथा नगरसेवक पंकज मराठे, नगरसेवक नजीरखान बेलदार, इमरान शेख, गोपाल दाणेज, विनोद पाटील, दगडू पवार, संदेश शिरोळे, दिपक अनुष्ठान, भूषण टिपरे, बांधकाम व्यावसायिक पी.आर. वाणी, संजय गोसावी यांच्यासह पत्रकार, नगरपालिकेचे आजी-माजी पदाधिकारी, अग्निशमक कर्मचारी उपस्थित होते.

**नवीन अग्निशमन गाडी शहराच्या सेवेत दाखल झाल्यामुळे भविष्यात कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत अधिक वेगाने आणि प्रभावीपणे मदतकार्य राबविणे शक्य होणार असल्याची भावना यावेळी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली.**

# आडगावात स्वातंत्र्य सेनानी शहादू चौधरींना श्रद्धांजली

प्रतिनिधी । एरंडोल

**तालुक्यातील कासोदा येथून जवळच असलेल्या आडगाव येथील स्वा.सै. शहादू सोमा चौधरी यांच्या ४४ व्या पुण्यतिथीनिमित्ताने हुतात्मा स्मारकाच्या सभागृहात श्रद्धांजली वाहण्यात आली आहे.**

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हभप. भानुदास महाराज हे होते. व्यासपीठावर मोहनदास महाजन, मधुकर पाटील, पांडुरंग पाटील, जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रमोद पाटील, डी.एन पाटील, संतोष पाटील हे होते. प्रल्हाद पाटील, मधुकर पाटील, प्रमोद पाटील यांनी विचार व्यक्त केलेत. यावेळी आडगाव हे स्वातंत्र चळवळीत अग्रस्थानी असलेले गाव, या गावात १९४२ च्या लढ्यात ३ हुताम्ये झाल्याचा इतिहास आहे. या गावात तालूक्यात सर्वात जास्त ३३ स्वातंत्र सैनिक होऊन गेलेत. हल्ली या गावातील ८० तरुण भारतीय सैन्य दलात आहेत. जिल्ह्यात केवळ दोनच ठिकाणी हुतात्मा स्मारक आहेत. त्यातील एक आडगाव येथे आहे. नि: स्वार्थ नेतृत्व असल्याने मंत्र्यांना जाब विचारण्याचे धाडस त्यांच्याकडे होते.